# Prabhat Kids School, Akola 2025-26
(CBSE Affiliation No. 1130426)

Std.VI Section : ____________ Subject : Marathi Marks : 80

Date : ______________ Term - I

Name :________________________________________ Roll No. ____________ Time : 3 Hrs.

## विभाग - अ (वाचन व आकलन)

**प्रश्न १: खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

तुम्हाला माहीत आहे का, आपल्या आजूबाजूला कितीतरी गोष्टी घडत असतात? कधी पाऊस येतो, कधी सूर्यप्रकाश असतो, कधी थंड हवा वाहते. हे सगळे निसर्गाचे चमत्कार आहेत. निसर्गात डोंगर आहेत, नद्या आहेत, झाडे आहेत आणि प्राणी-पक्षी आहेत. हे सगळे मिळून आपले सुंदर जग तयार झाले आहे.

आपल्याला जगायला हवा, पाणी आणि अन्न हे निसर्गातूनच मिळते. झाडे आपल्याला शुद्ध हवा देतात आणि फळे-फुले देतात. नद्या आणि तलाव आपल्याला पाणी पुरवतात. डोंगर आपल्याला थंडी-वाऱ्यापासून वाचवतात. प्राणी आणि पक्षी निसर्गाचा समतोल राखायला मदत करतात.

पण काही वेळा माणसे निसर्गाला त्रास देतात. झाडे तोडतात, नद्यांमध्ये कचरा टाकतात, प्राण्यांना मारतात. हे चुकीचे आहे. आपण निसर्गाची काळजी घेतली पाहिजे. झाडे लावली पाहिजेत, नद्या स्वच्छ ठेवल्या पाहिजेत आणि प्राण्यांना प्रेमळ वागणूक दिली पाहिजे.

जर आपण निसर्गाची काळजी घेतली, तर निसर्ग आपली काळजी घेईल. आपले जग नेहमी सुंदर आणि आनंदी राहील. चला तर मग, आपण सगळे मिळून आपल्या निसर्गाचे मित्र बनूया!

Sample Paper Prabhat Kids School, Akola

**अ.दिलेला गद्य उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा.(कोणतेही-५) ५ गुण**

१. आपल्या आजूबाजूला काय घडत असते?

अ) नाटक ब) मारामारी क) निसर्गाचे चमत्कार ड) संगीत

२. आपल्याला निसर्गातून काय मिळते?

अ) शुद्ध हवा ब) अशुद्ध पाणी क) अशुद्ध अन्न ड) वरील सर्व

३. वृक्षांपासून आपल्याला काय मिळते?

अ) फळे ब) फुले क) शुद्ध हवा ड) वरील सर्व

४. नद्या आणि तलाव आपल्याला काय पुरवतात?

अ) खेळणी ब) पुस्तके क) पाणी ड) कपडे

५. माणसांचे कोणते कृत्य निसर्गाला त्रासदायक आहे?

अ) झाडे लावणे ब) नद्या स्वच्छ करणे

क) झाडे तोडणे आणि नद्यांमध्ये कचरा टाकणे ड) प्राण्यांवर प्रेम करणे

६. आपण कोणाची काळजी घेतली पाहिजे?

अ) आपल्या घराची ब) आपल्या मित्रांची क) निसर्गाची ड) आपल्या शिक्षकांची

**आ. दिलेल्या गद्य उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) ३ गुण**

१. निसर्गाची काळजी घेतल्यास काय होईल?

२. आपण सगळे मिळून कोणाचे मित्र बनावे?

३. माणसाकडून कोणत्या चुकीच्या गोष्टी घडतात?

४. आपल्याला जगायला आवश्यक असणाऱ्या तीन गोष्टी आपणास कोठून मिळतात?

**प्रश्न २ : खाली दिलेली कविता काळजीपूर्वक वाचा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .**

उठूनी सकाळी ती मधमाशी!!
जाते की मध मिळवायासी!!
थेंबे थेंबे साठवी त्यासी!!
उद्योगी मोठी!!

आळस तिजला ठाऊक नाही!!
सर्व दिवस ती खपते पाही!!
थंडी ऊन म्हणे ना काही!!
उद्योगी मोठी!!

गोड गोड मध निपटुनि घेते!!
थोडा म्हणुनी मुळी न रुसते!!
साठवूनी तो जपून ठेवते!!
उद्योगी मोठी!!

थोडाही गुण मिळता घ्यावा!!
साठा त्याचा नित्य करावा!!
कोणालाही तो शिकवावा!!
ठेवा हे चित्ती!!

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**अ. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडा. (कोणतेही ४) ४ गुण**

१ : मधमाशी सकाळी उठून कोठे जाते?

अ) खेळायला ब) मध मिळवायला क) शाळेला ड) झोपायला

२ : मधमाशी कशी कामे करते?

अ) हळू हळू ब) रडत रडत क) उद्योगीपणे ड) गाणी गात

३ : कवितेनुसार मधमाशीला काय ठाऊक नाही?

अ) काम ब) आनंद क) आळस ड) मध

४ : मिळालेला मध मधमाशी कसा ठेवते?

अ) लगेच खाते ब) साठवून ठेवते क) दुसऱ्याला देते ड) फेकून देते

५ : आपण मधमाशी पासून कोणता गुण शिकायला पाहिजे?

अ) भांडण करण्याचा ब) आळशीपणाचा

क) उद्योगी असण्याचा ड) खोटे बोलण्याचा

**आ. दिलेल्या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतीही ३) ३ गुण**

१. मधमाशीच्या कोणत्या गुणामुळे ती मोठी उद्योगाची वाटते?

२. या कवितेतून आपल्याला काय प्रेरणा मिळते?

३. कवितेनुसार मध कसा असतो?

४. मध कोण निपटून घेते?

५. मनी या शब्दाचा समानार्थी शब्द कवितेतून शोधून लिहा.

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**विभाग - ब (व्याकरण)**

**प्रश्न ३ अ. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३) ३ गुण**

१. <u>**विशाल**</u> शूर मुलगा आहे. (अधोरेखित शब्दाचे नाम ओळखा)

अ. सामान्य नाम ब. भाववाचक नाम क. विशेष नाम ड. सर्वनाम

२. खालील पर्यायातून विशेष नामाचा योग्य पर्याय निवडा.

अ. गोदावरी ब. माणूस क. पुस्तक ड. मोठेपणा

३. मी <u>**प्राणी**</u> पाहिला आहे. (अधोरेखित शब्दाचे नाम ओळखा)

अ. भाववाचक नाम ब. विशेष नाम क. सामान्य नाम ड. अ व ब

४. भाववाचक नामांचा गट कोणता तो ओळखा.

अ. वकिली, मनुष्यत्व, लुच्चेगिरी ब. राम, सागर, रहीम

क. मी, तो, हा ड. वरीलपैकी नाही

**आ. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३) ३ गुण**

१. ______________ शाळेतील सर्वात हुशार मुलांच्या गटातला आहे.

(रिकाम्या जागी योग्य सर्वनाम लिहा.)

अ. तो ब. ती क. ते ड. त्याचे

२. पावसात भिजू नये म्हणून तिने छत्री उघडली.

(वाक्यातील योग्य सर्वनाम ओळखून लिहा.)

अ. पावसात ब. नये क. छत्री ड. तिने

३. पुढीलपैकी सर्वनाम असणारा पर्याय ओळखा.

अ. बक्षीस	ब. मी	क. नवीन	ड. टाकला

४. सर्वनामाचे उपप्रकार किती आहे?

अ. पाच	ब. सहा	क. सात	ड. आठ

**इ. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** **३ गुण**

१. मी सुंदर फुलपाखरू बघितले. (वाक्यातील विशेषण ओळखा)

अ. मी	ब. सुंदर	क. बघितले	ड. फुलपाखरू

२. पुढीलपैकी विशेषण असणारा पर्याय ओळखा.

अ. हुशार	ब. विद्यार्थी	क. ताक	ड. राम

३. मैदानात मुलांनी तीन-तीन च्या रांगा केल्या. (वाक्यातील विशेषण ओळखा)

अ. रांगा	ब. मुलांनी	क. मैदानात	ड. तीन-तीन च्या

४. राम ________ राजा होता. (रिकाम्या जागी योग्य विशेषण लिहा.)

अ. दयाळू	ब. व्यापारी	क. विद्यार्थी	ड. अ व क

**ई. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतीही ३)** **३ गुण**

१. आम्ही शाळेत रोज प्रार्थना म्हणतो. (वाक्यातील क्रियापद ओळखा)

अ. शाळेत	ब. रोज	क. आम्ही	ड. म्हणतो

२. रविवारी मी मित्रांसोबत खेळायला ____________.

अ. जातो	ब. म्हणतो	क. करतो	ड. पडला

३. पुढीलपैकी क्रियापद असलेला पर्याय ओळखा.

अ. अजय	ब. गोड	क. सुंदर	ड. खेळतो

४. मला घरी यायला रात्र झाली. ( वाक्यातील क्रियापद ओळखा.)

अ. मला	ब. घरी	क. रात्र	ड. झाली

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**प्रश्न ४ अ. सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **२ गुण**

१. खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

अ. प्रसन्न - चमकत होते	ब. किलबिल - मज्जा

क. बागडणे - बोलणारा	ड. सायंकाळ - संध्याकाळ

२. खालीलपैकी समानार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा.

अ. चिकाटी - जिद्द	ब. सुबक - गुंफण

क. वादळ - तुफान	ड. कष्टाळू वृत्ती - मेहनत करण्याचा स्वभाव

३. **उशीर** या शब्दाचा समानार्थी शब्द पुढील पर्यायातून ओळखा.

अ. पटकन	ब. लवकर	क. विलंब	ड. जलद

**आ. सूचनेनुसार उत्तरे लिहा (कोणतेही २)** **२ गुण**

१. खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

अ. दूर × लांब	ब. शेवट × सांगता	क. जमा × खर्च	ड. स्तुती × प्रशंसा

२. ‘जबाबदार’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायातून ओळखा.

अ. अयोग्य  ब. कमकुवत  क. बेजबाबदार  ड. पूर्ण

३. ‘अधोगती’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायातून ओळखा.

अ. प्रगती  ब. प्रमाण  क. सुशिक्षित  ड. उद्योगी

**इ. सूचनेनुसार उत्तरे लिहा (कोणतेही २) २ गुण**

१. ‘श्रीमान’ या शब्दाचे लिंग बदला.

अ. मुलगी  ब. आई  क. युवती  ड. श्रीमती

२. खालीलपैकी चुकीची लिंग जोडी ओळखा.

अ. धोबी-धोबीण  ब. पुत्र-कन्या  क. तरुण-तरुणी  ड. पेन-पेने

३. ‘झाड’ या शब्दाचे लिंग ओळखा.

अ. पुल्लिंग  ब. स्त्रीलिंग  क. नपुंसकलिंगी  ड. अ व ब

**ई. सूचनेनुसार उत्तरे लिहा (कोणतेही २) २ गुण**

१. ‘चूक’ या शब्दाचा अनेकवचनी शब्द ओळखा.

अ. चुकी  ब. चुका  क. चुकि  ड. चुकू

२. ‘भिंत’ या शब्दाचे वचन ओळखा.

अ. एकवचन  ब. अनेकवचन  क. बहुवचन  ड. समवचन

३. क्रीडांगणावर अंतिम **<u>सामना</u>** पाहण्यासाठी गर्दी जमली होती.

(अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

अ. सामने  ब. समान  क. समास  ड. समाज

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**विभाग - क (पाठ्यपुस्तक)**

**प्रश्न ५ अ. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४) ४ गुण**

१. रिमाने आनंदाने उड्या का मारल्या?

२. सुगरण पक्ष्याचे चार गुण लिहा.

३. चर्नी रोड उद्यानात केळुस्कर गुरुजी कशासाठी येत?

४. शेतातली पिके कशी डुलत होती?

५. सुगरण पक्षी सुबक वीण कशाने घालतो?

**आ. खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही ४) ४ गुण**

१. मुले घरटे पाहत असताना ____________ तेथे आले.

अ. पक्षी  ब. गुरुजी  क. सुगरण मादी  ड. पक्षी

२. ____________ हे घरटे शाबूत राहते.

अ. वादळातही  ब. उन्हाळ्यातही  क. हिवाळ्यातही  ड. पावसाळ्यातही

३. आम्ही ____________ बिलगलो.

अ. आजीला    ब. आईला    क. मामाला    ड. मामीला

४. आगगाडी ___________ करत चालली होती.

अ. जोरात    ब. सावकाश    क. झुक झुक    ड. अ व ब

५. गुरुजी व __________ यांच्यात गट्टी जमली.

अ. भीमराव    ब. विद्यार्थी    क. शिक्षक    ड. मुख्याध्यापक

**इ. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ४० ते ५० शब्दांत उत्तर लिहा.    ३ गुण**

१. गुरुजींनी सुगरण पक्ष्याविषयी कोणती माहिती दिली?

२. सुट्टी कधी संपली ते आम्हाला समजलेच नाही, असे मुलाला का वाटले? तुमच्या शब्दांत लिहा.

**ई. कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांतील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही ५)    ५ गुण**

(संधीचे सोने करणे, कुतूहल वाटणे, वाखाणणी करणे, शाबूत राहणे, तल्लीन होणे, गहिवरून येणे)

१. आपल्या मुलाला अनेक वर्षानंतर पाहून आईचा कंठ भरून आला .

२. देशाच्या विकासासाठी चांगले काम करणाऱ्या व्यक्तीची स्तुती करणे आवश्यक आहे.

३. कंपनीला नवीन प्रकल्प सुरू करण्याची संधी मिळाल्यावर त्यांनी संधीचा पुरेपूर उपयोग केला.

४. आजकालच्या पिढीला नवीन तंत्रज्ञानाबद्दल खूप जिज्ञासा वाटते .

५. त्याने वस्तू खूप जपून ठेवली त्यामुळे ती टिकून राहिली.

६. कलाकाराला त्याचे चित्र रेखाटण्यात गुंग झाल्यामुळे त्याला वेळ जाणवला नाही.

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**प्रश्न ६ अ. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४)    ४ गुण**

१. कवयित्रीला कुणाला जवळून पहावेसे वाटते?

२. पावसामुळे आईचे कोणते नुकसान झाले?

३. चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल?

४. पाऊस आला! पाऊस आला! या कवितेच्या कवयित्रीचे नाव लिहा.

५. चंद्रावरच्या शाळेत अभ्यास कसा करावा लागेल?

६. कवयित्रीला आकाशात कसे फिरावे असे वाटते?

**आ. खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही ४) ४ गुण**

१. भाजी - पोळीच्या डब्याची राहणार नाही ________________

अ. कटकट    ब. पटपट    क. गोळी    ड. ब व क

२. ____________ भणाण वारा .

अ. जिकडे तिकडे    ब. किल्ला    क. कडाड कडकड    ड. चडफड

३. निसर्गातल्या रंगांमध्ये मी ____________ जावे.

अ. रंगून ब. धरणीवर क. रंग ड. किरण

४. हवेवरी त्या होत स्वार मी, अवकाशी ______________.

अ. विहरावे ब. उतरावे क. झुलावे ड. ब व क

५. ____________ शाळेला सुट्टी!

अ. चला पळा ब. पाऊस आला क. दिवाळी ड. विजा चमकल्या

**इ. खालील प्रश्नांची २० ते ३० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही २) ४ गुण**

१. चंद्रावरच्या शाळेत पास केव्हा केले जाते ?

२. अचानक आलेल्या पावसामुळे दिवाळीत तुम्ही केलेल्या तयारीचे कोणकोणते नुकसान होते ते चार-पाच वाक्यांत लिहा.

३. कवयित्रीला कोणकोणत्या गोष्टी खऱ्या व्हाव्यात असे वाटते ?

Sample Paper Prabhat Kids School, Akola

**विभाग - ड (लेखन)**

**प्रश्न ७. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १२० ते १५० शब्दांत निबंध लिहा. ६ गुण**

१. माझा आवडता छंद - बागकाम

मुद्दे - बागेचे स्थान - बागेतील कामाची वेळ - उपयोगातील हत्यारे - कोण कोणती रोपे? - फुलझाडे? - पाणी देण्याची साधने - जोपासण्यासाठी घेतली जाणारी काळजी - मिळणारा आनंद - छंदाचे माणसाच्या जीवनातील स्थान

**किंवा**

२. मला पंख असते तर ......

मुद्दे - पंख असावेत असे का वाटते? - शहरातील रस्त्यावरची रहदारी - टाळता येईल - हवे तेव्हा कोठेही जाता येईल - शाळेत वेळेवर पोहोचता येईल - पंखांमुळे कोणत्याही झाडावर जाऊन फळे मिळतील - कोणी रागावले भांडले, तर उडून जाता येईल - आई ,बाबा, शिक्षकांची फजिती - पण आकाशात सुद्धा पक्षी चिडतील - चोचींचा मार

**प्रश्न ८. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक कथा लिहून समर्पक शीर्षक व अर्थपूर्ण तात्पर्य लिहा. ६ गुण**

१. मुद्दे - एक गरीब मुलगा - शाळेची फी भरण्यास पैसे नसणे - सकाळी पेपर टाकण्याचे काम - वाटेत पैशाचे पाकीट मिळणे - प्रामाणिकपणे पोलीस स्टेशनवर नेऊन देणे - पाकिटाच्या मालकाचा आनंद - बक्षीस - तात्पर्य

**किंवा**

२. मुद्दे - एक राजा -राज्यातील लोक आळशी -त्यांना उद्योगी बनविण्याचा विचार - रस्त्यात एक मोठा दगड ठेवतो - त्याच्याखाली एक लहानशी पिशवी - अनेक लोक बाजूने जातात, पण

दगड तसाच - एक गरीब माणूस तो दगड बाजूला काढतो -त्याला पिशवी दिसते - त्याला पिशवीत सोन्याची नाणी मिळतात - बाजूला बक्षीस अशी चिठ्ठी - लोक उद्योगी बनतात - तात्पर्य

**प्रश्न ९. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.(लिफाफा आवश्यक) ५ गुण**

१. श्रेया / श्रेयस सातपुते, विद्यार्थी प्रतिनिधी, गांधी विद्यालय, अकोला या नात्याने शाळेतील ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र सुमेध पुस्तकालय, आनंद नगर, अकोला यांना लिहीत आहे.

**किंवा**

२. विहान / विनीता साने, विद्यार्थी प्रतिनिधी, गांधी विद्यालय, अकोला या नात्याने शाळेत क्रीडा विभागासाठी क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र विविधा व्हरायटीज, रविवार पेठ, सावता माळी चौक, अकोला यांना लिहीत आहे.

---------

Sample Paper
Prabhat Kids School, Akola